**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 21-03-2026**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये काटोल ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-03-21 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2026-03-22 | 2026-03-23 | 2026-03-24 | 2026-03-25 | 2026-03-26 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0 | 0 | 0 | 0.3 | 0.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.2 | 34.4 | 36.2 | 37 | 38 |
| किमान तापमान (अं.से) | 20.4 | 20.5 | 22.1 | 24.1 | 25.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 45.3 | 39.4 | 41.2 | 44 | 39 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 13.4 | 14.4 | 14.4 | 16.1 | 14.4 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11.2 | 13.2 | 7.3 | 2.3 | 7.4 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 45 | 45 | 78.7 | 71.6 | 47 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 1 | 0 | 2 | 3 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• • आयएमडी, आरएमसी, नागपूर यांनी दिलेल्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस म्हणजेच २० ते २४ मार्च, २०२६ पर्यंत आकाश निरभ्र राहील. • २० आणि २१ मार्च २०२६ रोजी तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. • २२, २३, २४ मार्च २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. • २० मार्च २०२६ रोजी विजांच्या कडकडाटासह गारपीट/वादळ आणि सोसाट्याचा वारा (४०-५० किमी प्रति तास) पडण्याची शक्यता आहे. • २१ मार्च २०२६ रोजी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रति तास) पडण्याची शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

• - पुढील २ ते ३ दिवस जिल्ह्यात तुरळक ते काही ठिकाणी पावसाची शक्यता लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, मोहरी, जवस आणि इतर रब्बी हंगामातील परिपक्व अवस्थेतील पिकाची कापणी आणि मळणीची कामे करण्याला प्राधान्य द्यावे. • - कापणी केलेला शेतमाल शेतात उघड्यावर साठवलेला असल्यास तात्काळ प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • - बाजारायोग्य फळे, भाजीपाला पिकाची काढणी करावी. • - वादळी वाऱ्याची शक्यता लक्षात घेता फळबागा व भाजीपाला पिकास बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • - कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे पावसापासून होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा. • - शेतकरी बांधवांद्वारा पशुधनासाठी शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादीचे संभाव्य पावसामुळे नुकसान होऊ शकते अथवा त्याची प्रत व गुणवत्ता ढासळू शकते त्यामुळे शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादी चारा ताडपत्री अथवा प्लास्टिक शीट च्या सहाय्याने झाकून ठेवावा. • - मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. • - शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| रब्बी हंगामातील परिपक्व पिकाची काढणी व मळणी ला प्राधान्य द्यावे. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मोहरी | • परिपक्व अवस्थेतील मोहरी पिकाची काढणी आणि मळणी ची कामे सुरु ठेवावीत तसेच काढणी व मळणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| हरभरा | • परिपक्व अवस्थेतील हरभरा पिकाची काढणी आणि मळणी ची कामे सुरु ठेवावीत तसेच काढणी व मळणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | • परिपक्व अवस्थेतील गहू पिकाची काढणी आणि मळणी ची कामे सुरु ठेवावीत तसेच काढणी व मळणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | • परिपक्व अवस्थेतील जवस पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| टोमॅटो | • टोमॅटो पिकास ८ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे दोन ओलीतातील अंतर कमी जास्त करावे. पिक स्वच्छ राहण्यासाठी निंदनी करून घ्यावी. आवश्यक असलेल्या झाडांना काठीचा आधार द्यावा. • टोमॅटो पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पांढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| संत्रा | • संत्रा व मोसंबी पिकास ठिबक सिंचन पद्धतीद्वारे १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १२ ते ५३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ७८ ते १२७ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १४५ ते १८० लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस या प्रमाणात द्यावे. • तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. तसेच जमिनीमध्ये ओलावा टिकून राहण्यासाठी व बाष्पीभवनाचा दर कमी राहण्यासाठी झाडांच्या आळ्यामध्ये आच्छादनांचा वापर करावा. • संत्रा पिकावर सिट्रस सिला व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमिथोक्झाम ०.३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. • पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी घ्यावी. • संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम परमॅग्नेट १० ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालाक्झेल एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) या आम्लाची पेस्ट लावावी. • मेफेनोक्सम एमझेड ६८ @ २.५० ग्राम प्रती लिटर पाणी किंवा फोसेटील- एएल @ २.५० ग्राम प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • झाडाच्या बुंध्याला ६० सेंमी उंचीपर्यंत ब्रश च्या सहाय्याने बोर्डो पेस्ट लावावी. • आंबिया बहारातील फळ गळ टाळण्यासाठी २-४- डी १.५ ग्राम आणि १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तापमानातील वाढ (३५ ते ४० अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | • टरबूज पिकास लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्राचा उर्वरित नत्राचा हप्ता (४० किलो नत्र प्रती हेक्टर) द्यावा. • पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी निंदनी करावी तसेच फळ धारणा झाल्यानंतर वेली वरील फळे हि गवत किंवा पाला पाचोळ्याच्या सहाय्याने झाकून टाकावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| | प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |
| गाय | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. जनावरांकडून (उदा. बैल) सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजता दरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. |